# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहिर सूचना

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१८/९७५

दिनांक : 25 JAN 2018

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :- या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/ २०१८/८, दि. ०२.०१.२०१८

विषयांकीत जाहिर सुचनेस अनुसरून कळविण्यात येते की, राज्यातील विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या खालील अर्जाची प्राथमिक तपासणी दि. ३१.०१.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता व सुनावणी दि. ०१.०२.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार विद्यमान संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळी ऑन लाईन भरलेल्या खालील अर्जाची माहिती Confirm करुन त्यांनी खालील अर्जाच्या प्राथमिक तपासणीसाठी दि. ३१.०१.२०१८ रोजी व सुनावणीस दि. ०१.०२.२०१८ रोजी उपस्थित रहावे.

१) विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे / सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.
२) विद्यमान संस्थेत अतिरीक्त इंडीग्रेटेड व ड्युअल डिग्री सुरू करणे, पदविका व पदवी संस्थेत NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे.
३) विद्यमान संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमाचे रुपांतरण प्रथम पाळीत करणे.
४) विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरू करणे व याउलट करणे
५) ओसीआय / पीआयओ/ परदेशी नागरीक/आखाती देशातील भारतीय कर्मचा-यांची मुले यांच्यासाठी नव्याने अधिसंख्या जागा सुरू करणे
६) अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी / मुलींसाठी नव्याने जागा ठेवण्यास सुरूवात करणे

विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी त्यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या अर्जाची प्राथमिक तपासणी आणि सुनावणीस येतांना संदर्भीन जाहिर सुचनेतील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद कागदपत्रांचे २ संच (स्पायलर बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), तसेच AICTE यांचेकडे सादर केलेल्या अर्जातील माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१८-१९ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह उपस्थित राहवे. दि. ३१.०१.२०१८ रोजी आयोजित अर्जाच्या तपासणीसाठी माहितीगार संस्थेच्या प्रतिनिधींनी (प्राचार्यांनी प्राधिकृत केल्याच्या प्राधिकारपत्रासह) उपस्थित राहवे, मात्र दि ०१.०२.२०१८ रोजीच्या सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१) सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /खाजगी विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये
२) सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.